**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०७**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :-२४/०१/२०२०

प्रति,

मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती **सभा क्र-०७ मंगळवार दि.२८/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

प्र. नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**मंगळवार दिनांक - २८/०१/२०२० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १४३ | अहमदनगर महानगरपलिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी मानधनावर नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४४ | अहमदनगर महानगरपालिका सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापासुन अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४५ | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकी करीता Four wheeler tipper खरेदीस येणा-या खर्चास मा.स्थायी समिती मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १४६ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी Bio-Methanation Plant (१०TPD = ५ TPD x २ no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरूस्ती करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत ई- निविदा क्र.२२१५ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेच्या लिफाफा क्र.२ मधील दराबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १४३ मंगळवार दि.२८/०१/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपलिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी मानधनावर नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ- १.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. ४६२ दि.२१/७/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव

२. मा.स्थायी समिती ठराव क्र. ७० दि.०६/०२/२०१८ चा ठराव

उपरोक्त विषयान्वये की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. पा.पु. ४६२ दि.२१/७/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आस्थापना विभागामार्फत दि.२१/८/२०१७ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावावरील मा.आयुक्त साहेब यांचे दि.१५/१२/२०१७ च्या शेरांकनानुसार इकडील जा.क्र. आस्था. वर्क. २८५ दि.२१/१२/२०१७ अन्वये मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र.७० दि.०६/०२/२०१८ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

"ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरीता तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत पाणीपुरवठा विभागाने प्रस्ताव सादर करतांना ५(पाच) कर्मचा-यांच्या ऐवजी ३ (तीन) कर्मचा-यांचा प्रस्ताव सादर केला आहे. उर्वरित २ (दोन) कर्मचा-यांबाबत स्पष्टता होत नसल्याने व आस्थापनेवर नियमित वेतनश्रेणीवर घेण्याची मागणी केली असल्याने याबाबत बोध होत नाही तरी नियुक्ती बाबत योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा."

संबंधीतांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने पुढील कालावधी करीता पुर्ननियुक्ती बाबत सदरचा प्रस्ताव निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे जा.क्र. आस्था. वर्क ४३ दि.२६/०६/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेल्या होता. सदरच्या प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र.१८ दि.१४/१०/२०१५अन्वये ठराव पारित करून जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ५८८३ दि.०६/११/२०१५ अन्वये खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०९/११/२०१५पासून सहा महिन्याकरिता अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत कार्यवाही करण्यात आलेली होती.

| अ क्र | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | भालेराव संतोष छबु | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | आशिष रमेश शेलार | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | सागर मनोहर उबाळे | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | खान इम्रान आयुब | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | जैसवाल राजेंद्र रामआसरे | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |

सदर वरील प्रमाणे केलेल्या संबंधीतांची मानधनावरील करारबध्द कालावधीतील नियुक्तीची मुदत ही यापुर्वीच दिनांक ०८/०५/२०१६ रोजी समाप्त झालेली असुन सद्यस्थितीमध्ये संबंधीत नियुक्तीधारक हे पाणीपुरवठा विभागामध्ये कार्यरत नाही./अ

उपरोक्त संदर्भिय पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र.४६२ दि.२१/७/२०१७ अन्वये वरील तक्त्यात मधील १] भालेराव संतोष छबु ,२] आशिष रमेश शेलार ,३] खान इम्रान आयुब फक्त यांचाच पुर्ननियुक्ती बाबत प्रस्ताव सादर केलेला होता. तथापि सदर प्रस्तावामध्ये १] सागर मनोहर उबाळे ,२] जैसवाल राजेंद्र रामआसरे यांचे नावाचा समावेश नाही. पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र.४६२ दि.२१/७/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने १] भालेराव संतोष छबु ,२] आशिष रमेश शेलार ,३] खान इम्रान आयुब यांचे पुर्ननियुक्ती बाबत दिनांक २१/०८/२०१७ रोजी आस्थापना विभागाने प्रस्ताव सादर करून त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागामध्ये तांत्रिक पदांवर आउटसोर्सिंग पध्दतीने (बाहययंत्रणेद्वारे) मनुष्यबळ उपलब्ध होणेबाबत कार्यवाही प्रस्तावीत असल्याने संबंधीताची पुर्ननियुक्ती करणे उचित वाटत नसल्याचे नमुद केलेले होते. तथापि सदर प्रस्तावावर मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव मंजुरीकरिता पाठविणे बाबत निर्देशित केलेले होते./ब

तरी पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र. पा.पु. ४६२ दिनांक २१/७/२०१७ अन्वयेच्या प्रस्तावावरील मा.स्थायी समिती ठराव क्र.७० दि.०६/०२/२०१८ च्या पारित ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर./क

येणेप्रमाणे प्र. सहा. आयुक्त, आस्थापना यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा केली "अ" मध्ये नमुद केल्यानुसार दि.०८/०५/२०१६ पासून ते आजपर्यत कार्यरत नाही. तरी या ०५ पैकी ०३ त्यावेळीच्या करारबध्द कर्मचा-यांनी पुर्ननियुक्ती मिळण्याबाबत अर्ज केला आहे. तरी "ब" मध्ये outsounerg ने भरण्याबाबत धोरण ठरविण्यात आले आहे. "क" मध्ये प्रशासनाने निर्णय घ्यावा असे नमुद केले आहे. तरी तांत्रिक सहाय्यक या पदावर नियुक्ती देण्याकरिता मा.स्थायी समितीकडे पाठवावे याबाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.)साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा करावी.

यावर मा.उपायुक्त(सा.)साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा झाली मा.स्थायी समितीकडे पाठवा.

यावर मा. आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी मानधनावर नियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत माहिती सांगा.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- पाणी पुरवठा विभागाकरीता तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदाकरीता पाच कर्मचा-यांच्या मानधनावर नियुक्या करण्यात आल्या होत्या.मध्यंतरीच्या काळात यापाच कर्मचा-यांना कामावर घेण्यात आले नव्हते.यामधील तीन कर्मचारी श्री.भालेराव ,श्री.शेलार ,श्री.खान यांनी पुन्हा अर्ज करून यापदावर काम करण्यातची तयार दर्शवुन विनंती अर्ज केला आहे.या कर्मचा-यांची मानधनावर नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या निर्णयास्तव ठेवण्यातआलेला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- या कर्मचा-यांबरोबर अधिनियम १९६१ अंतर्गत शिकावू उमेदवार श्री.पवार अक्षय पोपट व श्री.काळे सोमनाथ केशव या दोन कर्मचा-यांची कुशल पाईप फिटर यापदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.यामधील काळे सोमनाथ केशव यांनी दि.१३/१०/२०१७ ते १२/१०/२०१९ पर्यत प्रभाग समिती क्रमांक १ सावेडी,नागापुर,बोल्हेगांव या भागामध्ये महानगरपालिकेच्या पाईप लाईन दुरूस्तीचे काम केले आहे.त्यांना या भागातील महानगरपालिकेच्या पाईप लाईनची माहिती आहे.व श्री.पवार अक्षय पोपट यांनी प्रभागा समिती क्र.२ मधील कल्याण रोड,शिवाजीनगर या भागातील महानगरपालिकेच्या पाण्याच्या लाईन दुरूस्ती करण्याचे काम यापुर्वी केले असल्याने त्यांना या कामाचा अनुभव आहे.या दोन अनुभवी कामगारांना महानगरपालिकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.

मा.श्री.अविनाश घुले :- ऑफिस रिपोर्ट नुसार पाणीपुरवठा विभागातील तात्पुरत्या स्वरूपात तांत्रीक सहाय्यक या पदाकरीता प्रस्तावातील नमुद पाच तांत्रीक सहाय्यक यामधील तीन कर्मचारी १] भालेराव संतोष छबु ,२] आशिष रमेश शेलार ,३] खान इम्रान आयुब यांच्या प्राप्त अर्जानुसार मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.तसेच पाणीपुरवठा विभागातील बरेच कायम कामगार सेवानिवृत्त झाल्याने त्याजागी नविन कामगारांच्या नियुक्या न झाल्याने पाणीपुरवठयावर विपरीत परिणाम झाला आहे.नागरीकांच्या तक्रारींमध्ये वाढ होत आहे. श्री.काळे सोमनाथ केशव व श्री.पवार अक्षय पोपट यांची महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये तात्पुरत्यास्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.नियुक्ती बाबतची कार्यवाही पाणीपुरवठा विभागने करावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार पाणीपुरवठा विभागातील तात्पुरत्या स्वरूपात तांत्रीक सहाय्यक या पदाकरीता प्रस्तावातील नमुद पाच तांत्रीक सहाय्यक यामधील तीन कर्मचारी यांच्या प्राप्त अर्जा नुसार १] भालेराव संतोष छबु २] आशिष रमेश शेलार ३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर नियुक्तीस तसेच सभेममध्ये प्राप्त अर्जावर झालेल्या चर्चा नुसार श्री.काळे सोमनाथ केशव व श्री.पवार अक्षय पोपट यांची महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये पाईप फीटर या पदावर तात्पुरत्यास्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तत्वतः तात्पुरत्या स्वरूपात मानद नेमणूक देण्याबाबत पुढील कार्यालयीन सोपस्कार पर पाडण्याबाबत पाणी पुरवठा विभागाने उचीत कार्यवाही करावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार पाणीपुरवठा विभागातील तात्पुरत्या स्वरूपात तांत्रीक सहाय्यक या पदाकरीता प्रस्तावातील नमुद पाच तांत्रीक सहाय्यक यामधील तीन कर्मचारी यांच्या प्राप्त अर्जा नुसार १] भालेराव संतोष छबु २] आशिष रमेश शेलार ३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर नियुक्तीस तसेच सभेममध्ये प्राप्त अर्जावर झालेल्या चर्चा नुसार श्री.काळे सोमनाथ केशव व श्री.पवार अक्षय पोपट यांची महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये पाईप फीटर या पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर.तत्वतः नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. बाबत पुढील कार्यालयीन सोपस्कार पर पाडण्याबाबत पाणी पुरवठा विभागाने उचीत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदगनर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १४४ मंगळवार दि.२८/०१/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापासुन अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अग्नीशमन विभाग

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की,आज मितीस महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अग्निशमन दलामार्फत आपत्कालीन प्रसंगी सेवा पुरविली जाते.परंतु इतर महानगरपालिकां प्रमाणे कोणत्याही प्रकारचे शुक्ल/अग्निशमन कर आकारणी केली जात नाही.

संदर्भिय शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ दि.६ डिसेंबर २००८ पासुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केला आहे.या अधिनियमाचे कलम ४ अन्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ शासनाने दि.२३ जून २००९ रोजी मंजूर करून शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ लागू करण्यात आलेले असून दि.२२जून २०१० रोजीच्या मनपाच्या सर्वसाधारण सभेच्या प्रस्तव क्र.९ अन्वये सदर अधिनियम व नियमांची अंमलबजावणी व कार्यवाही होणे करिता सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्याने अधिनियम व नियमांन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी उपरोक्त अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी /कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी शासन निर्णयानुसार नगरविकास विभाग क्र.अशस१४०७/३६०/प्र.क्र२११ /नवि२० दि.३१/०८/२००९ नुसार अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुदीनुसार "आग सुरक्षा निधी" त्याचबरोबर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम१९४९ चे कलम १२९ चे (क) च्या ६३ नुसार 'अग्निशमन कर 'आकारणे बंधनकारक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे ज्या अग्निशमन सेवा अशा प्रकारचा कर आकारत नाहीत त्यांनी तो तात्काळ चालू करणे आवश्यक आहे.असे संदर्भिय शासकिय परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले असल्याने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्यांचे २%अग्निशमन कर सन २०२०-२१ आ आर्थिक वर्षा पासून लागू करण्यास आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल की,विभागाने प्रस्तावित केलेल्या मनपा हद्दीतील अग्निशमन कर २% सन २०२०-२०२१ लागु करण्यात बाबत मा.स्थायी समितीला मंजूरीसाठी मागील पृष्ठ क्रमांक १ वरील अ मान्यतेस्तव सादर

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केलेनुसार मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधीकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापासुन अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभाग प्रमुख या प्रस्तावाबाबतची माहिती सांगा.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :-अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी उपरोक्त अधिनियम २००६चे कलम २५(३)नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी /कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी शासन निर्णयानुसार नगरविकास विभाग क्र.अशस१४०७/३६०/प्र.क्र२११ /नवि२० दि.३१/०८/०९ नुसार अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुदीनुसार "आग सुरक्षा निधी" त्याचबरोबर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम१९४९ चे कलम १२९ चे (क) च्या ६३ नुसार 'अग्निशमन कर 'आकारणे बंधनकारक आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- मी स्वतः अग्निशमन विभागामध्ये तेथील कर्मचा-यांबरोबर चर्चा केली.या विभागाची आवस्था अत्यंत दयनिय असून कोणतेही कर्मचारी प्रशिक्षीत नाहीत.हे कर्मचारी अत्यंत सुस्थ झालेले असून यांना रोज अग्निशमन विभागाच्या नियमानुसार कसरती किंवा परेड प्रात्यक्षीक्षांचे आयोजन केले पाहिजे.या सर्व कर्मचा-यांचे पद बिगारी आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- मी वेळोवेळी या विषयावर सभेमध्ये चर्चा केली आहे.गेल्या सहा ते सात वर्ष पासुन एकही समस्या या विभागाची सुटलेली नाही.नगर चे सुदैव आहे की,मोठी दुंघटना घडलेली नाही.आज बिगारी पदाचे कर्मचारी या विभागात काम करीता आहेत.मिसाळ साहेब,एखादी मोठी घटना घडल्यास तुम्हाला जबाबदार धरण्यात येईल.तुम्ही कोणालाही पाठीशी घालू नका.

मा.श्री.अविनाश घुले :- अग्निशमन विभागामध्ये कोणत्याही कर्मचारी ड्रेस कोड परिधान करीता नाही.त्यांना हेल्मेट सक्तीचे असतांना ते कधी हेल्मेट वापरतांना दिसत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- मी सभापती असल्यापासुन अग्निशमन विभागाकरीता प्रशिक्षीत कर्मचारी मानधनावर नियुक्त बाबत वरंवार ठराव केले आहेत.व सुचना दिल्या आहेत.परंतु या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- अग्निशमन विभागाकरीता आउटसोर्सीग व्दारे प्रशिक्षीत कर्मचारी भरणे बाबत निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- आपण मालमत्ता धारकाच्या बीला मध्ये वृक्ष करा पोटी कीती रक्कम वसूल केली जाते ?

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- अंदाजे एक कोटी रूपये वसूल होतात.

मा.श्री.कुमार वाकळे :- या मधून किती ठिकाणी आपण झाडे लावली.आपण वृक्ष करा पोटी एवढया मोठया प्रमाणात कर जमा करता मग वृक्ष का लावत नाहित.महाराष्ट्रातील इतर नगरपालिका व महानगरपालिके च्या धर्तीवर ऑक्सीजन निर्माण करणारी वृक्षे लावण्यात यावीत.याचे सर्वात चागला ऑक्सीजन पार्क बारामती येथे आहे.तेथे जावून पाहून या.

मा.श्री.गणेश भोसले :- मी ब-याच सभेमध्ये वृक्ष गणना करण्याच्या सुचना दिल्या आहेत.शासनाने देखील वृक्ष गणना करण्याचे आदेश दिले आहेत.का करीत नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- मालमत्ता धारकांकडून वृक्ष करापोटी जमा होणा-या रकमेचे स्वतंत्र बॅक खाते निर्माण करून या मध्ये जमा होणा-या रकमेतून वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाकारीता होणारा खर्च भागविण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- अखेर मंजूरीसाठी प्रस्ताव मा.महासभे कडेस सादर करण्यांत यावा. महासभेपुढे ठेवण्यात यावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- प्रस्ताव महासभेत ठेवण्याची शिफारस करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापासुन महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत चा प्रस्ताव महासभेत निर्णयास्तव ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच मालमत्ता धारकांकडून वृक्ष करापोटी जमा होणा-या रकमेचे स्वतंत्र बॅक खाते निर्माण करून या मध्ये जमा होणा-या रकमेतून वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाकारीता होणारा खर्च भागविण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापासुन अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत चा प्रस्ताव महासभेत निर्णयास्तव अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.तसेच मालमत्ता धारकांकडून वृक्ष करापोटी जमा होणा-या रकमेचे स्वतंत्र बॅक खाते निर्माण करून या मध्ये जमा होणा-या रकमेतून वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाकारीता होणारा खर्च भागविण्यात यावा.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७

विषय क्रमांक- १४५ मंगळवार दि.२८/०१/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकी करीता Four wheeler tipper खरेदीस येणा-या खर्चास मा.स्थायी समिती मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी कार्यालय/ घनकचरा व्यवस्थापन

संदर्भ-१. नगर विकास विभाग क्र.स्वअम-२०१८ /प्र.क्र.३५५ (८) / नवि-३४ दि.३० जानेवारी २०१९ शासन निर्णय

२. मा. महासभा प्रस्ताव क्र.२० दि.१३/०९/२०१९ चा मंजूर ठराव

३. मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांची दि.०१/०१/२०२० ची मंजूर टिप्पणी

४. मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांची दि.०२/०१/२०२० ची मंजूर टिप्पणी

५.अहमदनगर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी / घनकचरा जा.क्र.६९२ दि.०७/०१/२०२० रोजीची वाटाघाटीची पत्र

६. मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली यांचे दि.०८/०१/२०२० चे पत्र

वरील संदर्भात विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनस विभागाकरिता मा. शासन निर्णयानुसार व मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकीकरिता Four wheeler tipper खरेदीसाठी Gem Portal वर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेमध्ये १] मे.चिंतामणी मोटर्स, मिरज, सांगली, २] मे. भन्साळी ऑटो मोटिव्ह , राहता , अहमदनगर , ३] मे. कॅान्टिनेंटल इंजिन्स प्रा.लि. नवी दिल्ली, ४] मे. पिंपाडा मोटर्स , संगमनेर, अहमदनगर ,५] मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली ,६] मे. हिंद ट्रेडींग कंपनी, इंदोर या निविदाकारांनी सहभाग नोंदविला आहे. सदर प्राप्त निविदाकारांचे तांत्रिक लिफाफे छाननी समितीस उपायुक्त(कर), मेकॅनिकल इंजिनिअर,उ प्रादेशिक परिवहन अधिकारी (आमंत्रीत सदस्य) मुख्य लेखाधिकारी व वैद्यकीय आरोगय अधिकारी यांचे उपस्थित झाली. सदर छाननी केली असता १]मे.चिंतामणी मोटर्स, मिरज, सांगली, २] मे. भन्साळी ऑटो मोटिव्ह , राहता,अहमदनगर , ३] मे. कॅान्टिनेंटल इंजिन्स प्रा.लि. नवी दिल्ली, ४] मे. पिंपाडा मोटर्स, संगमनेर, अहमदनगर ,५] मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली हे पुरवठादार पात्र ठरजेले आहे व मे.हिंद ट्रेडींग कंपनी,इंदौर हे अपात्र ठरलेले आहे.त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३नुिसार व्यापारी लिफाफे उघडले असता खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार दर प्राप्त झालेले आहे.

| न्युनतम दरांनुसार अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | दर |
|---|---|---|
| एल -१ | मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली | रू.५,३९,९९९/- |
| एल -२ | मे. पिंपाडा मोटर्स , संगमनेर, अहमदनगर | रू.५,६९,७८६/- |
| एल -३ | मे. कॅान्टिनेंटल इंजिन्स प्रा.लि. नवी दिल्ली, | रू.५,९०,०००/- |
| एल -४ | मे.चिंतामणी मोटर्स, मिरज, सांगली, | रू.५,९७ ७८६/- |

| | | |
|---|---|---|
| एल -५ | मे. भन्साळी ऑटो मोटिव्ह , राहता , अहमदनगर | रू.६,१९,८००/- |

तरी उपरोक्त तक्ता पाहता सर्वा त कमीचे दर हे मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली यांचे असल्यामुळे सदर पुरवठादार हे एल-१ ठरलेले आहे.त्यानुसार त्यांना वाटाघटी करीता संदर्भ क्र.५ नुसार दिनांक ०८/०१/२०२० रोजी बोलविण्यात आलेले होते.वाटाघटी नुसार संदर्भ क्र.६ नुसार त्यांनी Four wheeler tipper पुरवठा करण्यास तयार आहे.तरी कचरा संकलन व वाहतुकीकरिता Four wheeler tipper खरेदीसाठी मा.स्थायी समितीसमोर मंजुरीकरीता व पुढील आदेशास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वैदयकिय आरोग्य अधिकारी यांचा अहवाल असे.

सावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१.नस्तीवर पृष्ठ क्र.नमुद नाहीत पुर्तताकरावी २. एकुण किती वाहने खरेदी करावयाची आहेत व खरेदीची एकुण रक्कमी किती यांच्या टिप्पणीतील उल्लेख केलला नाही विभागाने खत्री करावी .

लेखाशिर्षक (बजेट) नमुद नाही

उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता नगरविकास विभागचे शासन निर्ण दि.३० जानेवारी २०१९ मधील तरतुदीप्रमाणे सदरचे वाहनाचे प्रकार वाहनाची वाहतुक क्षमता (टनामध्ये ) इ.बाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अहमदनगर यांचे सदरचे वाहन भविष्यात मनपाच्या दृष्टीने फायदेशीर व किफायतीशीर असल्या बाबत तांत्रिक अभिप्राय घेणे उचित राहिल.प्राप्त निविदा मधील एल-१ निविदाकाराचे दर प्रचलीत बाजार भावाशी तुलना करून वाटाघाटी अंती विभागाला उचित निर्णय घेता येईल.

तथापी मनपाने खजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुकीसाठी ३ वर्षा करीता खाजगी ठेकेदाराची निविदा मंजुर केली असल्याने सदरच्या ठेका नविन वाहने खरीदी केल्यानंतर रद्द करणार कींवा कसे यांच्या टिपणीतउल्लेख दिसुन येत नाही.त्यामुळे सदरची नविन वाहने भाडे तत्वावर खाजगी संस्थाना नगरविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक ३०जानेवारी २०१९ नुसार अभिप्रेत नाही.व त्या शासन निर्णशी सुसंगत नाही.तसेच मनपातील कार्यरत वाहने व नविन वाहने यांचे भाडयाचे दर उप प्रादेशीक परिवाहन अधिकारी यांनी निश्चित केलेले दिसुन येत नाही वरिल उपरोक्त बाबींची खत्री करून वै.आरोग्य अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख व वाहन विभाग प्रमुख यांनी नविन वाहने खरेदी बाबत प्राप्त झालेल्या एल -१ निविदा कराशी वाटाघाटी अंती निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्रायानुसार सादर करावे.

यावर वैदयकिय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,१. नस्तीवर पेजींग करण्यात आलेले आहे.

२. एकुण ६४ वाहने खरेदी करावयाची असून यासाठी एकुण ४ कोटी रूपये निधी डि.पी.आर.मध्ये मंजूर करण्यात आली आहे.३.लेखाशिर्ष मंजूर डि.पी.आर.मधील आहे.४.तांत्रिक समितीने छाननीकेली कायदेशीर व किफायतीशीर बाबत खत्री केली आहे.५.नविन वाहने खरेदी केल्यानंतर स्वयंभु ट्रान्सपोर्ट ,पुणे यांना आर.टी.ओ.दराने सदरची वाहने भाडयाने घ्यावी लागतील असे स्पष्ट

कार्यारंभात आदेश व करारनाम्यात नमुद केले आहे.६. शासन निर्णयाशी मॉडेल टाटा ए.सी ई हे सुसंगत आहे

त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरी करीता ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.मुलेप पृष्ठ क्र.टि.२६ व टि २७ दि.१६/१/२०२० चे अभिप्रायाचे अवलोकन करून विभागाने पृष्ठ क्र.टि २८ वरील केलेल्या खुलाशानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरी साठी मान्यतेस्तव सादर .

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केलेनुसार मे. मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली यांची कमी दराची निविदा प्रति रक्कम रू ५,३९,९९९/- मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे निर्णयार्ाी पाठविणेकामी मान्यता मिळणेसाठी सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्थायी समिती सभा ताताडीने घेवून त्यात प्रस्ताव ठेवण्यात यावे.जेणेकरून शहराचे घनकचरा संकलन अजून व्यवस्थीत होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनास मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकी करीता Four wheeler tipper खरेदीस येणा-या खर्चास मा.स्थायी समिती मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.कुमार वाकळे :- किती गाडया घेण्यात येणार आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- एकुण ६४ वाहने खरेदी करावयाची असून यासाठी एकुण ४ कोटी रूपये निधी डि.पी.आर.मध्ये मंजूर करण्यात आली आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- एकुण ६४ वाहने खरेदी करण्यासाठी अंदाजे किती खर्च येणार आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- अंदाजे रू. ३ कोटी ५० लाख खर्च येणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- या मंजूर डि.पी.आर.रकमेतुन या वाहनांच्या खरेदी नंतर उर्वरीत रकमेतुन जेटींग मशीन वाहनासह खरेदी करण्यात यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- कचरा संकलन व वाहतुकीचा ठेका दिला असल्योन नव्याने घेण्यात येणारी ६४ वाहने ठेकेदारास भाडेतत्वावर देण्यात येणार आहे किंवा कसे ?

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- आर.टी.ओ.व्दारे प्रचलीत केलेल्या भाडे दरानुसार स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे या कार्यरत असलेल्या कचरा संकलन व वाहतुक करणा-या संस्थेस भाडे तत्वावर देण्यात येणार आहेत.

मा.सभापती साहेब :- या सर्व गाडयांचे रजिष्ट्रशन व इंन्शुरन्सचा खर्चाबाबत सांगा

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- या गाडयांचे रजिष्ट्रशन व इंन्शुरन्सचा खर्च मनपास करावा लागेल या मंजूर डि.पी.आर.रकमेतुन या वाहनांच्या रजिष्ट्रशन फि व इंन्शुरन्सचा खर्च भागाविता येईल.

मा.सौ.सोनाली चितळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. उर्वरीत रकमेतुन रस्ते झाडण्याकरीता जेंटींग मशीन वाहनासह खरेदी करण्यात यावी.

मा.श्री.अविनाश घुले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. महानगरपालिकेने या वाहनांच्या रजिष्ट्रशन फि व इंन्शुरन्सचा खर्च मंजूर डि.पी.आर. मधील उर्वरीत रकमेतुन करावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनास मा. शासन निर्णयानुसार व मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकीकरिता प्राप्त झालेल्या निधी मधून Four wheeler tipper खरेदीसाठी Gem Portal वर प्राप्त मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली यांची रू.५,३९,९९९/- प्रति वाहन या सर्वात कमी दराच्या निविदादरास मान्यता देण्यात येत आहे.व मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालामधील वाहन खरेदीकरीता असलेल्या उर्वरित रकमेतुन महानगरपालिकेने या ६४ वाहनांच्या रजिष्ट्रशन फि व इंन्शुरन्सचा खर्च करावा,ठेकेदारने ईन्शुरन्ससहीत वाहने पुरविल्यास त्या करीता झालेल्या खर्चाची अदागी ठेकेरास करण्यास मान्यता देण्यात येत आहे. व या करीता येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनास मा. शासन निर्णयानुसार व मंजुर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार कचरा संकलन व वाहतुकीकरिता प्राप्त झालेल्या निधी मधून Four wheeler tipper खरेदीसाठी Gem Portal वर प्राप्त मे. घोडू इन्फोटेक प्रा.लि. नवी दिल्ली यांची रू.५,३९,९९९/- प्रति वाहन या सर्वात कमी दराच्या निविदादरास मान्यता देण्यात येत आहे.व मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालामधील वाहन खरेदीकरीता असलेल्या उर्वरित रकमेतुन महानगरपालिकेने या ६४ वाहनांच्या रजिष्ट्रशन फि व इंन्शुरन्सचा खर्च करावा,ठेकेदारने ईन्शुरन्ससहीत वाहने पुरविल्यास त्या करीता झालेल्या खर्चाची अदागी ठेकेरास करण्यास मान्यता देण्यात येत आहे. व या करीता येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.सोनाली चितळे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही/-

ठराव सर्वानुमुते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- १४६ मंगळवार दि.२८/०१/२०२०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी Bio-Methanation Plant (१०TPD = ५ TPD x २ no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरूस्ती करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत ई- निविदा क्र.२२१५ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेच्या लिफाफा क्र.२ मधील दराबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी Bio - Methanation Plant (10 TPD = 5 TPD X 2 no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत ई-निविदा क्र.२२१५अन्वये निविदा मागविण्यात आली आहे.

सदर ई- निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या असल्याने छाननी समितीने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत शिफारस केल्यामुळे दिनांक १८/०१/२०२० रोजी दोन्ही निविदाकांराचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

वरील तुलनात्मक तक्ता पहाता बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी Bio - Methanation

| अ. क्र | निविदाकाराचे नाव | Veg 5 TPD क्षमतेचे Bio Methantion Plant उभारणीचे दर | Veg 5 TPD क्षमतेचा Bio Methantion Plant एक वर्ष देखभाल व दुरुस्तीचे दर | NonVeg 5 TPD क्षमतेच Bio Methantion Plant उभारणीचे दर चालविणेचे दर | NonVeg 5 TPD क्षमतेचे Bio Methantion Plant एक वर्ष देखभाल व दुरुस्तीचे दर | एकुण दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, | रु.१,६२,८५,०५०/- | रु.१४,२८,७५०/- | रु.१,९९,०३,९५०/- | रु.१७,४६,२५०/- | रु३,९३,६४,०००/- |
| 2 | Urja Bio system pvt,Ltd, | रु.१,३१,४५,६४१.९६ | रु.३५,४०,०००/- | रु.२,१२,९३,१९४.२३/- | रु.३५,४०,०००/- | रु४,१५,१८,८३६/- |

Plant (10 TPD = 5 TPD X 2 no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत Meilhem Ikos Environment Pvt,Ltd,या निविदाकाराचे दर कमी असल्याने सदर निविदाकारास दिनांक २०/०१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. वाटाघाटी बोलविण्यात आले होते. सदर निविदाकाराने वाटाघाटीनंतर खालील दराप्रमाणे काम करण्यास तयार असले लेखी पत्र दिलेले आहे.

| अ. क्र | निविदाकाराचे नाव | Veg 5 TPD क्षमतेचे Bio Methantion Plant उभारणीचे दर | Veg 5 TPD क्षमतेचा Bio Methantion Plant चालविणेचे दर | NonVeg 5 TPD क्षमतेच Bio Methantion Plant उभारणीचे दर चालविणेचे दर | NonVeg 5 TPD क्षमतेचे Bio Methantion Plant एक वर्ष देखभाल व दुरुस्तीचे दर | एकुण दर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, | रु.१,६२,००,०००/- | रु.१४,००,०००/- | रु.१,९८,००,०००/- | रु.१७,३०,०००/- | रु ३,९१,३०,०००/- |

बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी Bio - Methanation Plant (10 TPD = 5 TPD X 2 no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, या निविदाकाराने नमुद केलेले दर वाजवी आहेत. तरी सदर दराबाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव स्थायी समितीकडेस पाठविणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचाअभिप्राय की,१. सामान्य प्रशासन विभगाचे पत्र क्र२६६ दिनांक १७/०७/२०१८ मा.महासभा व मा.स्थयी समिती च्या ठरावाची अंमलबजावणी बाबत विभागाने खात्री करावी

२. प्राप्त एल- १ निविदा काराच्या तांत्रीक कामाच्या बाबतीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्रधिकरण शासन निर्णय दि.३० जाने.२०१९ मधील परिच्छेदानुसार अभिप्राय घेणे संयुक्तीक राहिल.

३. प्राप्त निविदामधील अ..क्र.२ उर्जा बायोस्टीम प्रा.ली.यांचे ई - निविदेतील प्राप्त दर पृष्ठ क्र.३०० व ३०१ वरिल अस्पप्टता व वाचता येत नाही याची प्रकल्प विभागाने खात्री करावी.

४. प्राप्त झालेल्या एल १ निविदाकाराचे दर Meilhem Ikos Environment Pvt,Ltd यांच्या वाटाघाटी अंती दिलेले दर हे चालू बाजारभावातील दराशी तुलना करून अवाजवी नसल्याची विभागाने खात्री करून पृष्ठ क्र. टि १२ वरील अ बाबत विभागाने निर्णय घ्यावा.

यावर प्रकल्प विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,फेरसादर,मा.मुलेअ यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा खालिल प्रमाणे

१. मा.स्थायी समितीने सदर विषयाची ठराव केल्याने त्याची अंमलबजावणी बाबत प्रस्ताव सादर करण्यात येईल.

२. महाराष्ट्र जीवन प्रधिकरण हि संस्था हि केवळ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंजुर झाल्रेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मधिल अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याचे काम करत स्व्च्छ भारत अभियान अंतर्गत मजीपा ही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नाही.सास्तव निविदेमधील प्राप्त.दारबात मजीप्रा यांचा अभिप्राय घेण्याची आवश्यकता नाही तसेच डिपीआर मधील बायोमिथेनायझोन प्रकल्प करीता मजीप्राने दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार नमुद अंदाजपत्रकीय मान्यतेप्रक्षा प्रप्त दर हे कमी आहेत.

३. प्राप्त निविदेमधील व्यापारी लिफाफामधील उर्जा बायोसिस्टीम या एजन्सीचे दर हे ऑनलाईन ई निविदेव्दारे डाउनलोड केले आहेत व दर हे अंकी व अक्षरी असे नमुद केले आहेत प्राप्त दराची खातरजमा व तुलना करूनच प्रस्ताव सादर करण्यात आल आहे.

४. प्राप्त झालेल्या एल १ दर हे मंजुर डिपीआर मधील दरापेक्षा कमी आहेत व वाटाघाटी अंती पुन्हा दर करून घेण्यात आले आहे.

यावर मा.उपयुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मुख्यलेखापरिक्षक यांनी केलेल्या आक्षेपावर उपअभियंता,प्रकल्प विभाग यांनी खुलासा केला आहे.सदर खुलाशाची सहमत आहे.त्यानुसार टि-१२ वर प्रस्तावित केलेनुसार Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, या कमी दराच्या निविदाकाराने वाटाघाटीअंती कमी केलेल्या दरास शिफारस करून मान्येतेकामी मा.स्थायी सतिीकडे पाठविणेस हरकत नाही निर्णयार्थ सादर

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सदर केस NG--- मधील असल्यामुळे तातडीने स्थायी समितीची बैठक घ्यावी लागेल

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

****

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई - निविदा क्र.२०३३ मधील बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) याठिकाणी घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजुरी नुसार Bio-Methanation Plant (१०TPD=५TPDx २ no) खरेदी करणेकामी व एक वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती करीता प्राप्त दरानुसार वाटाघाटी प्रमाणे दरास मंजुरीस्तव व प्रशासकीय मंजुरीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा

घनकचरा विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- बुरूडगांव कचरा डेपो येथे ५ मेट्रीक टन चे दोन Bio-Methanation Plant टाकणार आहोत.शहरातील स्लॉटर हाउस मधून जे वेस्ट निघते.ते सध्या तसेच टाकले जाते.त्यामुळे आपल्याला एन.जी.टी.ने गाईड लाईन दिल्या आहेत.हे शास्त्रोक्त पध्दतीने डिसपोज करा. Bio-Methanation Plant टाका.त्याचा डि.पी.आर.सुध्दा मंजूर आहे.त्यानुसार आपण टेंडर काढले आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- Bio-Methanation Plant बाबत सविस्तर माहिती सांगा, शहरातील चिकन व मटन विक्रेते आहेत.ते शहरात कोठेही प्लॅस्टीक गोणी मध्ये निघलेले वेस्ट माझ्या भागातील नदी व नाल्यामध्ये टाकतात.त्यामुळे मोठया प्रमाणात दुर्गधी सुटते.आज तुम्ही बोल्हेगांव रोडवर जावुन पहा सर्वत्र प्राण्याचे अवशेष पहायला मिळतील.या करीता सध्या कचरा संकलन व वहातुकीकरीताअसलेले ठेकेदार यांना प्रत्येक चिकन व मटनाच्या दुकानावर जावून प्रण्यांचे वेस्टेज कलेक्शन करणे बाबत सुचना देण्यात याव्यात जेणे करून दुकानदार नदी व नाल्यांमध्ये प्रण्यांचे वेस्टेज टाकणार नाही.जे दुकानदार वेस्टेज इतरत्र टाकतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

मा.सभापती साहेब :- शहर हद्दीमध्ये रस्त्याच्या कडेला असलेल्या चिकन व मटन शॉप यांच्याकडून निर्माण होणा-या वेस्टेज ची विल्हेवाट याच प्रकल्पा अंतर्गत करण्यात यावी.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- मांडलेल्या सुचनेची कार्यवाही करण्यात येईल.

मा.श्री.कुमार वाकळे :- नेमकी काय प्रोसेस होणार.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- यावर प्रोसेस होवून यापासुन गॅस तयार होणारहे जे टेंडर आहे हे फक्त डिस्पोज करणे करीता आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सध्या चालू असलेले स्वच्छता सर्वेक्षण चे काम चांगले चालू असून सर्वांचे अभिनंदन.

मा.श्री.अविनाश घुले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.स्वच्छता सर्वेक्षणच्या कामात सातत्य आवश्यक असून सध्याचे काम चांगले असल्याने सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी Bio-Methanation Plant (१०TPD = ५ TPD x २ no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, या निविदाकाराने नमुद केलेल्या ई- निविदा क्र.२२१५ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेच्या लिफाफा क्र.२ मधील दरांस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ या ठिकाणी Bio-Methanation Plant (१०TPD = ५ TPD x २ no) उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत Meilhem Ikos Environment Pvt,Ltd, या निविदाकाराने नमुद केलेल्या ई- निविदा क्र.२२१५ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेच्या लिफाफा क्र.२ मधील दरांस मान्यता देण्यात येत आहे.तसेच शहर हद्दीमधील सर्व चिकन व मटन शॉप यांच्याकडून निर्माण होणा-या वेस्टेज ची विल्हेवाट याच प्रकल्पा अंतर्गत करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका